दैनिक रजि.नं.

ता. .०२.२०२६

समरी क्रिमी.केस नं. /२०२६

SCC356/2026

मे.ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट फर्स्ट क्लास, वडगाव
यांचे कोर्टात

Ex.1/C

वडगाव सराफ व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
पेठ वडगाव तर्फे क्लार्क श्री.सुहेल फिरोज बागवान
व.व.- ३१ धंदा - नोकरी
रा.पेठ वडगाव ता.हातकणंगले जि.कोल्हापूर } फिर्यादी

विरूध्द

सौ.सुनंदा भानुदास धनवडे.
व.व.५२ धंदा ः नोकरी व घरकाम
रा.सिध्दार्थनगर, पेठ वडगाव.
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. } आरोपी

Order

Put up for Verification

sd/-
JMFC

दि निगोशिएबल इस्ट्रुमेंट (अमेंड्ेड) ॲक्ट
कलम १३८ व १४२ प्रमाणे व फिर्याद.

यातील फिर्यादीची फिर्याद अशी की,

१. यातील फिर्यादी संस्था हि दि महाराष्ट्र को-ऑप ॲक्ट प्रमाणे नोंदणीकृत झालेली संस्था आहे. सदर संस्थेचा व्यवसाय हा सभासदांचे कडून ठेवी स्विकारणे, परत देणे, कर्जे देणे, वसुल करणे अशा प्रकारचा आहे.फिर्यादी संस्थेचे मॅनेजर श्री बाळासो लालासो पाटील व क्लार्क श्री.सुहेल फिरोज बागवान व यासीन अब्दुल शिकलगार हे असुन सदरची फिर्याद दाखल करणेचा अधिकार त्यांना फिर्यादी संस्थेने दिलेला आहे.त्याप्रमाणे सदरची फिर्याद दाखल केलेली आहे.

२.यातील आरोपी यांनी फिर्यादी संस्थेतून ता.०७.०६.२०२४ रोजी रक्कम रू.१,००,०००/-

..२

(रूपये एक लाख मात्र) चे नजरगहाण कर्ज घेतलेले आहे. सदरचे आरोपीने घेतलेले कर्जाचे हप्ते थकीत असुन कर्ज खाते थकीत झालेले आहे. त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपींचे कडे वेळोवेळी थकीत कर्ज भरणेची मागणी केली असता आरोपींनी फिर्यादी संस्थेत कर्ज रक्कमेचे देणे पोटी ता. १६.०१.२०२६ रोजी बँक ऑफ इंडीया शाखा- पेठ वडगाव येथील खातेचा चेक नं.६८२८८२ चा रक्कम रू.१,२0,000/-(रूपये एक लाख वीस हजार फक्त) चा कर्ज खातेवर भरला. सदरचा चेक फिर्यादींनी त्याच दिवशी राजारामबापु सहकारी बँक लि.पेठ शाखा - पेठ वडगाव येथे संस्थेचे खातेवर वटवणे साठी भरला असता तो चेक " फंडस् इनसफिशियंट " (Funds Insufficient) अशा शे-यानिशी ता.१७.०१.२०२६ रोजी न वटता परत आला आहे. वर नमुद केले प्रमाणे आरोपीचे खाते असले बँक ऑफ इंडीया शाखा- पेठ वडगाव, जि.कोल्हापूर येथील खातेवर फिर्यादी संस्थेत कर्ज खातेवर भरले चेक मध्ये नमुद केले एवढी रक्कम जमा नाही याची माहिती असताना आरोपींनी फिर्यादी संस्थेत कर्ज खातेवर जाणुन बोजून न वटणारा बोगस चेक भरून तो वटविणेस सांगुन फिर्यादी संस्थेची फसवणूक केलेली आहे. त्यामुळे आरोपीने दि निगोशिएबल इस्ट्रुमेंट (अमेंडेड) ॲक्ट कलम १३८ व १४२ प्रमाणे गुन्हा केलेला आहे.

३. त्यानंतर फिर्यादींनी वकीलांचे मार्फत ता.२९.०१.२०२६ रोजी रजि.पोष्टाने चेक मधील नमुद रक्कम देणे बाबत आरोपीस नोटीस पाठविली असता आरोपीने सदर नोटीस ता.३१.०१.२०२६ रोजी स्वीकारलेली आहे. सदर नोटीसीत नमुद केले प्रमाणे १५ दिवसाचे मुदतीत आरोपी यांनी फिर्यादी संस्थेत कर्ज खाातेवर रक्कम जमा केलेली नाही. अशाप्रकारे आरोपीनी दि निगोशिएबल इस्ट्रुमेंट (अमेंडेड) ॲक्ट कलम १३८ व १४२ प्रमाणे गुन्हा केलेला आहे.

४. **फिर्यादीस कारण** ः फिर्यादी यांनी वकीलांचे मार्फत ता.२९.०१.२०२६ रोजी रजि.पोष्टाने आरोपीने फिर्यादींना दिले चेक मधील नमुद रक्कम मागणीची नोटीस पाठविली असता आरोपीने सदर नोटीस ता.३१.०१.२०२६ रोजी स्वीकारून ही सदर नोटीसीत नमुद केले प्रमाणे १५ दिवसाचे मुदतीत आरोपींनी फिर्यादी संस्थेत कर्ज खातेवर चेक मधील नमुद रक्कम जमा केलेली नाही तेव्हा व नंतर वेळोवेळी फिर्याद दाखल करणेस कारण घडले आहे.

..२

५ .सदरची फिर्याद मुदतीत दाखल केलेली आहे .

६ .**सबब फिर्यादीची विनंती की,**

वर नमुद केले प्रमाणे आरोपी यांनी फिर्यादीस त्यांचे देणे असले कर्ज रक्कमेपोटी बँक ऑफ इंडीया शाखा – पेठ वडगाव जि .कोल्हापूर येथील खातेवर रक्कम जमा नसताना खोटा व बोगस चेक कर्ज खातेवर भरून सदरचा चेक फिर्यादी संस्थेस वटविणेस सांगीतले मात्र तो चेक न वटता परत आला आहे .अशाप्रकारे यातील आरोपीने न वटणारा चेक कर्ज खातेस भरून फिर्यादी संस्थेची फसवणुक व विश्वासघात केला आहे .आरोपींनी केलेले कृत्य हे दि निगोशिएबल इस्ट्रुमेंट (अमेंडेड) ॲक्ट कलम १३८ व १४२ प्रमाणे गुन्ह्यास पात्र आहे .अशाप्रकारे आरोपींनी फिर्यादी संस्थेत न वटणारा बोगस चेक देऊन फसवणुक केले बद्दल जास्तीत जास्त शिक्षा करणेत यावी व आरोपीस चेक मधील नमुद रकमेच्या दुप्पट रक्कम दंड करणेत यावा .म्हणुन सदरची फिर्याद दाखल केली आहे .वडगाव .

ता .२४.०२.२०२६

Presented by

मे .जा .व्हावे .

वडगांव सराफ व्यापारी नागरी सह.पतसंस्था मर्या.
पेठ वडगांव, ता.हातकणंगले. जि.कोल्हापूर

यासी पुरावा खालील प्रमाणे ः

१ . फिर्यादी स्वतः

२ .शाखाधिकारी, बँक ऑफ इंडीया, शाखा – पेठ वडगाव

३ .शाखाधिकारी, राजारामबापु सहकारी बँक लि .पेठ, शाखा- पेठ वडगाव